# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९९ वा शुक्रवार दि.२० सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते भडी येथे सिमेंट रस्त्याचे लोकार्पण

**विकासाला दिलेला कौल कायम ठेवावा**

लोकसभा निवडणुकीत लातूरकरांनी काँग्रेसचा उमेदवार निवडला. लातूरकरांनी काँग्रेसने केलेल्या विकासाला आणि काँग्रेस, महाविकास आघाडीच्या विचाराला कौल दिला. हा कौल आगामी विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांनी कायम ठेवावा, असे आवाहन आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी ग्रामस्थांना केले.



लातूर/ प्रतिनिधी लातूर ग्रामीण मतदारसंघातील भडी येथे आमदार निधीतून झालेल्या सिमेंट रस्ता व नाली कामाचे (७ लाख) लोकार्पण लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले. लातूर ग्रामीण मतदारसंघातील बामणी व भडी (ता. लातूर) येथे मंगळवारी (दि. १७) विविध विकासकामांचे लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यासाठी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख उपस्थित होते. बामणी येथे ५६.४५ लक्ष तर भडी येथे ४७.८३ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामे चालू पंचवार्षिक वर्षात केली असल्याचे सांगून गावात आणखी विकासकामे आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. बामणी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी अभिवादन केले. श्री जय जगदंबा गणेश मंडळाच्या श्री गणेशाची व श्री जय जगदंबा मातेच्या मंदिरात आई जगदंबेची आरती केली. तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र चव्हाण, माजी सरपंच वैजनाथ दिवटे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन बालाजी बंडापल्ले, माजी नगरसेवक सचिन बंडापल्ले, युवक काँग्रेसचे सचिव अनंत ठाकूर तसेच भडी येथील कार्यकर्ते नामदेव अवस्कर, जब्बार सय्यद व सतीश पाटील यांच्या निवासस्थानी आमदार देशमुख यांनी भेट दिली. या वेळी संतोष देशमुख, पृथ्वीराज शिरसाठ, वाल्मीक माडे, राजकुमार पाटील, प्रवीण पाटील, सुभाष घोडके, शंकर बोळंगे, पुनीत पाटील, बालाजी वाघमारे, रघुनाथ शिंदे, बळवंतराव पाटील, संभाजी रेड्डी, अनिल जाधव, लक्ष्मण ठाकूर, आत्माराम माडे, नारायण पाटील, परमेश्वर पाटील, पांडुरंग वीर, विपिन गवरे, कमलाकर बाचपल्ले, धनंजय बाचपल्ले, सूर्यकांत वीर, अरुण वीर, गोविंद अवस्कर, विनोद वीर, निमा वीर, अनंत ठाकूर, उत्तम वीर, ज्ञानोबा वीर, दत्ता वीर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## जनतेने भाजपला धडा शिकविला

मुंबई : प्रतिनिधी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी पुन्हा एकदा भाजप आणि राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. महाराष्ट्रातल्या आणि देशाच्या जनतेचे अभिनंदन केले पाहिजे कारण ज्यावेळेस देशाची लोकशाही धोक्यात आली होती तेव्हा भाजपला धडा शिकवण्याचे काम देशाच्या जनतेने केले असा हल्लाबोल थोरात यांनी केला आहे. महाराष्ट्रातल्या आणि देशाच्या जनतेचे अभिनंदन केले पाहिजे, कारण ज्यावेळेस देशाची लोकशाही धोक्यात आली होती तेव्हा भाजपला धडा शिकवण्याचे काम देशाच्या जनतेने केले. तरी विषय संपलेला नाही. जोपर्यंत भाजप आहे, आरएसएस आहे तोपर्यंत देशाला आणि लोकशाहीला धोका आहे लक्षात ठेवा. तुम्ही मुंबईच्या जवळ राहता. तुम्हाला सर्व परिस्थिती माहिती आहे. कुर्ला आणि वरळी डेअरीच्या जमिनीचा कसा व्यवहार सुरू आहे ते बघा. मंत्रालय हे भ्रष्टाचाराचा केंद्रबिंदू बनलेले आहे, असा हल्लाबोल थोरात यांनी केला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था नाही, लोकांवर गाड्या घालण्याचे काम सुरू आहे. महायुतीतील नेत्यांना सत्तेचा अहंकार झालेला आहे, या सरकारला घालवण्याची जबाबदारी आता तुमची आहे. सरकार कसं बनलंय ते पाहा, जी पद्धत होती ती चुकीची आहे.

कोकण विभागात आपल्याला खूप काम करायला लागणार आहे. आपल्याला जास्त जागा कशा मिळतील ते पहायचे आहे. या निवडणुकीत काही तिकिटं आपल्याला मिळतील, काही मित्रांना मिळतील, लोकांना संदेश सांगायचा त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होतील. मे महिन्यात पालिकेच्या निवडणुका होतील, असे थोरात यांनी म्हटले आहे.

## आध्यात्म्यात कर्तव्याला महत्व: गहिनीनाथ महाराज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारांचे शानदार सोहळ्यात वितरण





लातूर/ प्रतिनिधी :– आपल्या संत परंपरेने आध्यात्म्यापेक्षा कर्तव्याला अधिक महत्व महत्व दिल्याने आपण त्याचे पालन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी येथे मंगळवारी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ वितरण सोहळ्यात ते बोलत होते. मंचावर खासदार डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थपाक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे(दिल्ली), मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, प्रा. विठ्ठल कांगणे, ह.भ.प. अनंत माने महाराज, जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, जिल्हाध्यक्ष अशोक देडे जिल्हा सचिव अशोक हनवते आदी उपस्थित होते. यावेळी गहिनीनाथ महाराज म्हणाले, एखाद्या कुटुंबात कोणाचे निधन झाले असेल तर त्याचा अंत्यविधी बाजूला ठेवून शेतात पेरणी करण्यासाठी महत्व दिले पाहिजे, असा संदेश आपल्या संतांनी दिला आहे. एकनाथ महाराजांनी देवाला पाणी घालण्यापेक्षा मरणासन्न गाढवाला पाणी पाजण्याचा उपदेश दिला आहे. प्लेटो काय म्हणतो यापेक्षा तुकोबाराय, एकनाथ महाराज काय म्हणतात, हे महत्वाचे. आपल्या संतांनी आधी केले, मग सांगितले. त्यामुळे आधी आपण सुधारल पाहिजे. त्यानंतर दुसऱ्याला सुधरण्याच्या भानगडीत पडा. दुसऱ्याची चुका दाखवण्यापेक्षा आपण आपली चूक दुरुस्त करा, असे आवाहनही महाराजांनी केले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, प्रा. विठ्ठल कांगणे, जयप्रकाश दगडे यांचेही यथोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी केले. आभार महादेव डोंबे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, शहर अध्यक्ष महादेव डोंबे, जिल्हा संघटक सुधाकर फुले, जिल्हा कोषाध्यक्ष अरुण कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर स्वामी, इलेक्ट्रॉनिक्स जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, हरून मोमीन आदीने परिश्रम घेतले.

**पत्रकारितेला मरण नाही: संजय भोकरे**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे म्हणाले, संस्कारातून संस्कृती आणि संस्कृतीला धरून सुधारणा झाली पाहिजे. आपल्याकडे आध्यत्मला विज्ञानाची जोड असल्याने भारत देश जगात सर्वश्रेष्ठ आहे. त्याच कारण संस्कार आणि संस्कृती आहे. आज ज्यांना पुरस्कार मिळाले त्यांच नक्कीच कौतुक करू, पण ज्यांना तो मिळाला नाही त्यांनीही प्रयत्नवादी राहिले पाहिजे. आपणाला पुढची पिढी घडवायची असेल तर हे बाळकडू दिल पाहिजे. विज्ञानाचे चमत्कार जरूर असतील, पण संस्कार विसरता कामा नये. अलीकडील काळात प्रसारमाध्यमात काही बदल झाले असले तरी पत्रकारितेला मरण नाही. राज्य मराठी पत्रकार संघाचा संस्थापक म्हणून मी सांगतोय, पत्रकारांनी नुसत पत्रकारिता करत बसाल तर काही उपयोग नाही. त्याला जोड व्यवसाय बघा. बदलांचा स्वीकार करा. वय झालेल्यांनी पण बदलत तंत्रज्ञान शिकून घ्यायला हरकत नाही. विशेषतः ग्रामीण भागामध्ये पत्रकारांना आधार नाही. त्याचसाठी आमची संघटना काम करत आहे. कोणत्याही पत्रकारावर अन्याय झाला तर संघटना त्यांच्या पाठीशी उभी राहते आणि ती पुढेही कायम राहील, असेही भोकरे यावेळी म्हणाले.

**पत्रकारांनी नेहमी सत्तेच्या विरोधात राहवे: वानखेडे**

राष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक, जेष्ठ पत्रकार अशोक वानखेडे म्हणाले, लोकप्रतिनिधींनी नेहमी जनतेसोबत राहिले पाहिजे. परंतु आमदार, खादारांना त्याचा विसर पडला आहे. लातूरचा पाणीप्रश्न निजाम काळापासून कायम आहे. त्यामुळे ७५ वर्षांपासून पाणी कुठं मुरतय समजत नाही. लातूरने मुख्यमंत्री दिला, मराठवाड्याने अनेक मोठे नेते दिले. विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन आदी नेते होऊन गेले. नेत्यांना लोकांनी काही कमी केलं नाही. मग आमचे नेते कुठे कमी पडले? पाणी द्यायच्या अगोदर स्वतःचे कारखाने उभारले, शैक्षणिक संस्था उभारल्या. पण लातूरकरांना पाणी नाही मिळाले. आज आपण मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा करत आहोत, पण आपण समस्यांनी मुक्त नाही झालो. पत्रकारांनी नेहमी सत्तेच्या विरोधात आवाज उठवत विरोधी पक्षाची भूमिका वठवली पाहिजे, असेही वानखेडे यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त मान्यवर शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विभागून कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रा. विठ्ठल कांगणे (परभणी), कालिदास माने (लातूर ) आणि डॉ. प्रशांत मुगळे (लातूर ), उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार बाई काकाजी उद्योग समूह (सनरीच, लातूर ), सहकार क्षेत्रातील सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार माजी मंत्री दिलीपराव देशमुख (लातूर), राजकीय क्षेत्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र भूषण पुरस्कार आमदार रमेशप्पा कराड(लातूर), सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबा आमटे महाराष्ट्र भूषण पुरस्कार विश्वजित अनिलकुमार गायकवाड (लातूर) आणि जगदीश माळी(लातूर), वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार डॉ. प्रमोद घुगे (लातूर) आणि डॉ. विणा पाटील (पुणे), प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार वर्ष घुगे–ठाकूर (जिल्हाधिकारी, लातूर), महिला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार रुपालीताई चाकणकर(पुणे) आणि विद्या पळसापुरे(लातूर), क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार पै सिकंदर शेख (महाराष्ट्र केसरी, मोहोळ) आणि पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार जयप्रकाश दगडे (लातूर) आणि सरिता कौशिक (संपादक, एबीपी माझा ) यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

## माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याकडून देशमुख कुटुंबियाचे सांत्वन



लातूर दि.१९/०९/२०२४ लातूर तालुक्यातील गोंदेगाव येथील पुष्पाबाई भागवतराव देशमुख (वय ६५ वर्ष) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना–नातवंडे असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या गोंदेगाव येथील निवासस्थानी भेट देऊन देशमुख परिवाराचे सांत्वन केले.

यावेळी सूर्यकांत देशमुख, शशिकांत देशमुख, शिल्पाताई देशमुख, समित देशमुख, आश्विनी देशमुख, ऋचा देशमुख आदी उपस्थित होते. तर माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या समवेत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख, राजेसाहेब देशमुख, बालासाहेब देशमुख, सतीश देशमुख,श्रीराम देशमुख, भरत भोसले, व्यंकट देशमुख, तुकाराम सोनवणे, विश्वनाथ जोगदंड, एमएनएस बँकेचे व्हाईस चेअरमन एस.आर.मोरे, जननायक संघटनेचे उध्दव जाधव, राजाभाऊ मुळे आदी उपस्थित होते.




लोकसभेतील विरोधी पक्ष नेते देशाचे नेते राहुलजी गांधी यांच्या बदल बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा नेते अनिल बोंडे आणी संजय गायकवाड यांच्या विरोधात अखिल भारतीय महिला कांग्रेस अध्यक्षा नेत्या अल्का जी लांबा व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा संध्याताई सवालाखे यांच्या आदेशाने लातूर जिल्हातिल महिला कांग्रेस ने प्रदेश उपाध्यक्ष विद्या ताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले

## आणखी एक प्रकल्प गुजरातला; महायुतीला मोठा धक्का!



नागपूर : प्रतिनिधी वेदांता–फॉक्सकॉन प्रकल्प, टाटा–एअरबस विमान प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेले होते. आता या प्रकल्पानंतर आणखी एक महाराष्ट्रात येणारा मोठा प्रकल्प गुजरातला गेला असल्याची माहिती आहे.विशेष म्हणजे हा प्रकल्प नागपूरला येणार होता. तब्बल १८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेला रिन्यूएबल ऍण्ड ग्रीन एनर्जी कंपनीचा (रिन्यू) सोलर पॅनल प्रकल्प गुजरातला गेला आहे. महाराष्ट्रात उद्योगासाठी आकारण्यात येणारे वीजदर जास्त असल्याचे तसेच अधिका–यांचे प्रयत्न अपुरे पडल्याने हा प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याची माहिती आहे. हा प्रकल्प अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात ३०० एकर जागेवर होणार होता. तीन हजार युवकांना रोजगार देण्याची कंपनीची योजना होती. मात्र, हा प्रकल्प गुजरातला गेल्याने स्थानिकांची निराशा झाली आहे. याआधी जे प्रकल्प गुजरातला गेले ते महाविकास आघाडी सरकारच्या धोरणामुळे गेल्याची टीका शिंदे गटाकडून करण्यात येत होती. मात्र, आता महायुतीच्या काळातही मोठे प्रकल्प गुजरातला जात असल्याने महाविकास आघाडीच्या निशाण्यावर महायुती सरकार असणार आहे. नागपूरला येणारा प्रकल्प गुजरातला गेल्याने महाविकास आघाडीकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करण्यात येण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रकल्प गुजरातला जात असल्याने महाविकास आघाडी हा प्रचारात मोठा मुद्दा बनवण्याची शक्यता नाकारता येत नाही.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# वादविवाद आणि गोंधळ सहाजिकच

महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा कोणताही तिढा नसून लोकसभा निवडणुकीत ज्याचा स्ट्राइक रेट जास्त होता त्याच पक्षाला जास्त जागा, हे जागावाटपाचे सूत्र असेल आणि जिंकून येण्याची क्षमता हा निकषसुद्धा असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्यामुळे महायुतीतील जागावाटपाचे सूत्र जरी समोर आले असले, तरी त्यामुळे राजकीय वादविवाद आणि गोंधळ होणे अपरिहार्य मानावे लागेल. कारण एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केल्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसनेही तातडीने बैठक घेऊन काही चर्चा केल्याचे समजते. लोकसभा निवडणुकीतील यशाच्या फॉर्म्युल्यावर जर विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करायचे ठरले, तर त्यामध्ये अजित पवार यांना खूपच कमी जागा मिळू शकतात, याची जाणीव अजित पवार यांनाही आहे. कारण लोकसभेमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पाच जागा लढवल्या. त्यापैकी फक्त एक जागा निवडून आली होती आणि त्यांचा स्ट्राइक रेट फक्त २० टक्के होता. भाजपने २८ जागा लढवल्या होत्या आणि त्यांच्या फक्त नऊ जागा निवडून आल्या होत्या, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १५ जागा लढवल्या होत्या आणि त्यांचे सात उमेदवार विजयी झाले होते. साहजिकच स्ट्राइक रेटचा विचार करता सर्वात जास्त स्ट्राइक रेट हा एकनाथ शिंदे यांच्याच पक्षाचा आहे. त्या खालोखाल भाजपचा आणि सर्वात कमी स्ट्राइक रेट हा अजित पवार यांच्या पक्षाचा आहे. अर्थात, हा निकष वापरून विधानसभेतील उमेदवार ठरवता येणार नाही, हे लक्षात आल्यानेच संबंधित उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमताही तपासली जाणार आहे. विविध प्रकारच्या पक्ष फुटींमुळे स्थानिक पातळीवरील राजकारण ढवळून निघाले आहे ते पाहता उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता ठरवणेसुद्धा अवघड जाणार आहे. कारण मुळात एखादा उमेदवार सध्या कोणत्या पक्षाशी निष्ठावान आहे हे ठरवणेसुद्धा अवघड झाले आहे. जेव्हा महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोनच आघाड्या समोरासमोर निवडणूक लढवत होते तेव्हा उमेदवारांचा विचार करत असताना कोणतीही अडचण येत नसे. जागावाटप झाल्याप्रमाणे जो तो पक्ष आपल्या उमेदवाराला तिकीट देत असे. पण आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांमध्ये फूट पडल्याने स्थानिक पातळीवरसुद्धा आपोआपच तेवढ्या प्रमाणात गट निर्माण झाले आहेत. या ठिकाणी जो आमदार गेल्या निवडणुकीत निवडून आला होता त्याला तिकीट द्यायचे ठरवले तर तो आमदार सध्या कोणत्या गटाची बांधिलकी मानत आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. साहजिकच दुसर्या गटाला आपला उमेदवार शोधण्यासाठी पुन्हा एकदा निवडून येण्याची क्षमता तपासून पहावी लागणार आहे. अर्थात, प्रत्यक्ष जागावाटप झाल्यानंतर या गोष्टी समोर येणार आहेत. पण त्यापूर्वीच एकनाथ शिंदे यांनी हा स्ट्राइक रेटचा मुद्दा मांडल्यामुळे २८८ जागांचे वाटप करत असताना स्ट्राइक रेटचे गणित कसे मांडणार हासुद्धा कळीचा मुद्दा ठरणार आहे. २८८ पैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्यावर भाजप ठाम आहे, तर अजित पवार यांनी पूर्वीपासून आम्हाला ८० जागा हव्यात असे म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनीसुद्धा आम्हाला १०० पेक्षा जास्त जागांची अपेक्षा आहे, असे सूचित केले आहे. या सर्व अपेक्षांची एकूण बेरीज २८८ या आकड्यामध्ये बसत नसल्यानेच स्ट्राइक रेटच्या आधारे जागावाटपाचे सूत्र ठरवताना अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक यातील प्रचाराचे विषय आणि प्राधान्यक्रमही वेगवेगळे असल्याने लोकसभा निवडणुकीतील विजयाच्या आधारे विधानसभा निवडणुकीचा उमेदवार ठरवण्याचा निकष कदाचित चुकूही शकतो. एका लोकसभा मतदारसंघामध्ये पाच ते सहा आमदार असल्यामुळे प्रत्येक मतदारसंघाची बांधणी आणि विचारसरणी वेगळ्या प्रकारे असते. जरी एखाद्या मतदारसंघात एका पक्षाचा खासदार निवडून आला तरी त्या मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघात त्या खासदाराने विजयी आघाडी घेतली असेल, असे सांगता येत नाही. प्रत्येक पक्षाचा गड आणि बालेकिल्ला ठरला असतो. विधानसभा निवडणुकीत हा गड आणि बालेकिल्ला राखण्याचा जास्त प्रयत्न केला जातो. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची गणिते अशी वेगळी असल्याने केवळ स्ट्राइक रेट न तपासता लोकसभा निवडणुकीत संबंधित विधानसभा मतदारसंघांमध्ये कोणत्या पक्षाने चांगली कामगिरी केली हे ठरवून त्या आधारे जागावाटप करणे जास्त शास्त्रीय ठरू शकते. अर्थात, याची जाणीव निश्चितच एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तिघांनाही आहे. पण तरीही जागावाटप वाटाघाटीमध्ये आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्यासाठी राजकीय नेते अशा प्रकारची विधाने करत असतात. महायुतीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे निश्चितच धडा घेतला आहे. त्यामुळे फारसे ताणून धरण्याच्या मनस्थितीत आणि परिस्थितीत कोणताही पक्ष नाही. महायुती एकत्र उभी राहिली तरच पुन्हा सत्ता मिळू शकते याची जाणीव सर्व नेत्यांना आहे. त्यामुळे येत्या काही कालावधीमध्ये जागावाटपाचे खरे सूत्र निश्चित होऊन जागावाटप अंतिम केले जाईल; पण विधानसभा निवडणुकीत जर विजय मिळवायचा असेल आणि पुन्हा सत्तेवर यायचे असेल तर उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता हा सर्वात महत्त्वाचा निकष असेल.

# हुशार, गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यादानाचा निरंतर यज्ञ



उत्तम शिक्षणाने उत्तम समाज घडवता येतो, यावर ठाम विश्वास असणाऱ्या समविचारी मंडळींच्या प्रयत्नांतून 'विद्यादान सहाय्यक मंडळा'ने गेल्या १६ वर्षांत राज्यातल ग्रामीण तसेच शहरी भागातील वंचित आणि दुर्बल घटकांतील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सर्वांगीण हातभार लावला जातो. अर्थसहाय्यासाठी काटेकोर निवड प्रक्रिया राबवली जाते. त्याबरोबरच विद्यार्थ्यांना व्यापक सामाजिक आणि संस्थात्मक कुटुंबांचा भाग करून घेण्याची कार्यपद्धती आणि त्यातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकास करणारे मूलगामी प्रारूप हे 'विद्यादान'चे वेगळेपण आहे.

वीस वर्षांपूर्वी म्हणजेच, २००४ सालच्या मध्यात 'लोकसत्ता'मध्ये ठाणे जिल्ह्यातील शहापूर या दुर्गम तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक परवडीसंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. शहापूरमधल्या त्या विद्यार्थ्याला दहावीत ९२ टक्के गुण मिळूनही केवळ घरची आर्थिक स्थिती खडतर असल्याने त्याला पुढील शिक्षण घेता येत नव्हते. ते वृत्त वाचून ठाण्यातील काही सुजाण मंडळी त्याच्यापर्यंत पोहोचली आणि तेथील विदारक स्थिती पाहून अस्वस्थता घेऊनच परतली. या मंडळींनी त्या मुलाला आर्थिक मदत केली, शिवाय त्याला ठाण्यात शिक्षणासाठी घेऊनही आले. परंतु प्रश्न केवळ एका मुलाचा वा कुटुंबाचा नव्हता. त्या भागातली बहुतांश सर्वच कुटुंबे अत्यंत हलाखीत, अभावात जगत होती. तिथल्या सर्वच विद्यार्थ्यांसमोर भवितव्याविषयी अनेक प्रश्न आ वासून उभे होते. त्या सर्वांना ठाण्यात घेऊन येणेही शक्य नव्हते. त्यातूनच मग या मंडळींनी शहापूरमध्येच संस्थात्मक पायाभरणी सुरू केली आणि १५ ऑगस्ट २००८ रोजी 'विद्यादान सहाय्यक मंडळ' ही संस्था आकारास आली. अभियंता म्हणून स्वेच्छानिवृत्ती घेऊन वयाच्या साठीत आनंदवनस्नेही मंडळाच्या माध्यमातून स्वत:ला समाजकार्यात वाहून घेतलेल्या दिवंगत भाऊ नानिवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'विद्यादान सहाय्यक मंडळा'ने कामास सुरुवात केली. वंचित मुलांच्या शिक्षणासाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेल्या या संस्थेशी, विविध क्षेत्रांचा अनुभव असलेले गीता शहा, संदीप भागवत, अदिती पंडित, नारायण पोंक्षे, वर्षा जोशी, निवेदिता जोशी, सुबोध जठार, प्रमथेश नवलेकर यांच्यासारखी अनेक मंडळी जोडली गेली आणि 'विद्यादान सहाय्यक मंडळा'चा कार्यविस्तार होत गेला. तसेच सुरुवातीच्या काळापासून उद्योजक अरुणभाई शेठ आणि 'केअरिंग फ्रेंड्स' संस्थेचे निमेशभाई शहा यांचे संस्थेला नेहमीच मार्गदर्शन मिळत आहे. कुठल्याही सरकारी मदतीशिवाय 'विद्यादान'चा हा निरंतर यज्ञ सुरू आहे. संस्थेचे मुख्य केंद्र ठाण्यात असून शहापूर, बोरिवली, पुणे, नागपूर आणि संभाजीनगर येथे संस्थेच्या शाखा कार्यरत आहेत. संस्थेच्या ठाणे आणि कळवा येथील सात वसतिगृहांतून ७० मुला-मुलींची राहण्या-जेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सक्षम विद्यार्थी, सक्षम राष्ट्र २००८ साली केवळ २३ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या ज्ञानकेंद्री उपक्रमातून गेल्या १६ वर्षांत ९१५ विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन आज स्वत:च्या पायावर उभे आहेत. संस्थेच्या मदतीने शास्त्र, वाणिज्य, कला, वैद्याकीय, अभियांत्रिकी, परिचर्या, उपयोजित कला अशा जवळपास १६ विद्याशाखांतील ७२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सक्षम विद्यार्थी घडवून सक्षम राष्ट्रनिर्माणासाठी प्रयत्नशील राहण्याचे ब्रीद संस्थेने जपले आहे. संस्थेचे माजी विद्यार्थी ही शिकवण लक्षात ठेवून स्वयंप्रेरणेने संस्थेच्या कामात पुढाकार घेत आहेत. संस्थेच्या ु. ीींहरपश. ैस या संकेतस्थळाची निर्मिती असो किंवा संस्थेची अंतर्गत विदा व्यवस्थापन (डेटा मॅनेजमेंट) प्रणाली विकसित करणे असो; माजी विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी त्यात मोलाचा वाटा उचलला आहे. विद्यार्थी निवडीची काटेकोर प्रक्रिया 'चला शिक्षक जोडू या'सारख्या अभियानाद्वारे संस्था ग्रामीण भागातील गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते. संस्थेच्या संकेतस्थळावर अर्ज करून, तसेच इतर संस्था अथवा हितचिंतकांच्या साहाय्याने गरजू विद्यार्थी संस्थेपर्यंत पोहोचतात. या सर्व विद्यार्थ्यांची काटेकोर पडताळणी केली जाते. अर्जदार विद्यार्थ्यांच्या घरी संस्थेकडून गृहभेटी घेतल्या जातात, विद्यार्थ्यांची कलचाचणी घेतली जाते. त्यानंतर मुख्य मुलाखत घेऊन विद्यार्थ्यांची अर्थसाहाय्यासाठी अंतिम निवड केली जाते. कार्यकर्ता पालक निवड प्रक्रिया पार पडल्यानंतर विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी 'विद्यादान'मध्ये प्रवेश मिळतो. वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेऊन संस्था विद्यार्थ्याचा प्रवेश पुढे सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेते. या प्रक्रियेत 'कार्यकर्ता पालक' महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रति विद्यार्थी एक या प्रमाणे सध्या ४६० हून अधिक 'कार्यकर्ता पालक' कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम संस्थेने १६ विविध विद्याशाखांच्या करिअर टीम तयार केल्या असून त्यांचे नेतृत्व या क्षेत्रातील अनुभवी आणि जेष्ठ मंडळी करत आहेत. विद्यार्थ्यांकरिता वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यात करिअर मार्गदर्शन सत्रे, कौशल्य विकास आणि संवाद कौशल्य विकसनाचे कार्यक्रम, सामाजिक शिबिरे, इंग्रजी संभाषणाचे वर्ग, वाचनालय, विविध कार्यशाळा, व्यावसायिक मुलाखत प्रशिक्षण, वक्तृत्व स्पर्धा, 'व्यक्त व्हा' व्यासपीठ आदींचा समावेश आहे. 'डिजिटल सक्षमीकरण' उपक्रमांतर्गत संस्था विद्यार्थ्यांना संगणक, लॅपटॉप आणि स्मार्ट फोन उपलब्ध करून देते. सामाजिक बांधिलकीचे संस्कार विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सामाजिक शिबिरांना पाठवून त्यांना सामाजिक प्रश्नांची आणि ते सोडवण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची जाणीव करून दिली जाते. यातून घडणारे विद्यार्थी आव्हानांचा, संकटांचा आणि समस्यांचा समर्थपणे सामना करण्यासाठी सक्षम होतात. याची प्रचीती करोना काळात 'विद्यादान'च्या विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध सामाजिक कामांमधून आली. 'विद्यादान'च्या माजी विद्यार्थ्यांतर्फे चालवल्या जाणाऱ्या 'बी फ्रँक' पथकाने समाजातील दुर्बल घटकांतील शाळकरी मुलांसाठी 'स्कूल चले हम' हा उपक्रम विकसित केला आहे. यात इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना 'कृतीतून शिक्षण' या तत्त्वाने विविध कौशल्ये शिकवली जातात. याद्वारे आठ हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांना संस्थेशी जोडून घेतले आहे. विविध पुरस्कार संस्थेच्या कामाची नोंद घेऊन संस्थेला 'गाइडस्टार इंडिया'कडून सन २०२३-२४ करिता पारदर्शक कार्यशैलीसाठी गौरविण्यात आले. 'मन:शक्ती केंद्रा'तर्फे 'मन:शक्ती सद्भावना पुरस्कारा'ने आणि 'आचार्य अत्रे कट्ट्या'तर्फे 'कृतज्ञता पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आला आहे. याशिवाय 'मास्टेक'तर्फे दिला जाणारा 'सीएसआर पुरस्कार'ही 'विद्यादान सहाय्यक मंडळा'ला मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचे वाढते शैक्षणिक खर्च, नवनवीन तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची निकड, राबविण्यात येणारे कार्यक्रम आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण यांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे. विशेषत: ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे, अधिकाधिक विद्यार्थ्यांना स्वावलंबी करणे, पूरक अभ्यासक्रम देऊन सक्षम करणे, मुलींच्या शिक्षणास विशेष प्रोत्साहन देणे, विविध उपक्रमांची आखणी करणे अशी उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. येत्या पाच वर्षांत 'विद्यादान'ची विद्यार्थी संख्या १,५०० पर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. आपणही सहभागी होऊ शकता आपण आपली मदत देणगी स्वरूपात किंवा समर्पित देणगीदार म्हणून विद्यार्थ्याची संपूर्ण शैक्षणिक जबाबदारी घेऊन, तसेच वस्तू स्वरूपात (लॅपटॉप, स्मार्ट फोन आदी), 'विद्यादान'च्या एखाद्या कार्यक्रमाचे प्रायोजक होऊन किंवा संस्थेच्या उपक्रमात सहभागी होऊन अथवा कार्यकर्ता, कार्यकर्ता पालक होऊन करू शकता.

# जनगणना दीर्घकाळापासून रखडलेली

जनगणना म्हणजे केवळ शिरगणती नव्हे. देशाची, देशवासीयांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती यांचा तो आरसा असतो. देश आधीच्या दहा-वीस वर्षांच्या तुलनेत विविध निकषांवर आता कुठे आहे, याचे भान त्यातून येते. कोणत्याही देशाच्या लोकसंख्याशास्त्रीय आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितीबद्दल सर्वात विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक माहितीचा मूलभूत स्रोत लोकसंख्या जनगणना असून ज्याचा प्रामुख्याने वापर सर्व स्तरांवरील नियोजनासाठी केला जाऊ शकतो. करोना काळात २०२१ मध्ये होणारी देशातील जनगणना दीर्घकाळापासून रखडलेली आहे. पार्श्वभूमी भारतात पहिली जनगणना व्हाइसरॉय लॉर्ड मेयोच्या नेतृत्वात १८७२ मध्ये सुरू होऊन, १८८१ मध्ये पहिली पूर्ण व अधिकृत जनगणना लॉर्ड रिपन यांच्या नेतृत्वाखाली झाली. त्यानंतर दर दहा वर्षांनी, न चुकता जनगणना होत गेली. सन २०११ मध्ये १५वी जनगणना झाली.नंतर सन २०२१ मध्ये १६वी जनगणना अपेक्षित होती. २८ मार्च २०१९ रोजी केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांनी जनगणना-२०२१ गृहमंत्रालयाद्वारे आयोजित करण्याचा हेतू सूचित केला होता. जनगणनेच्या इतिहासात प्रथमच कागद पेनऐवजी मोबाइल उपकरणाचा वापर करून माहिती गोळा करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला होता. २०२१च्या जनगणनेचे घोषवाक्य आहे, 'आमची जनगणना-आमचे भविष्य'. परंतु कोविड-१९ मुळे पुढील आदेशापर्यंत जनगणनेची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली. जनगणनेच्या १५० वर्षांहून अधिक वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारताने जनगणनेची तारीख चुकवली आहे, ती कोविडमुळे तीन वर्षांहून अधिक काळ पुढे ढकलली आहे. कोविड-१९ च्या साथीच्या रोगामुळे एकीकडे जनगणनेत विलंब झाला हे मानले तर, याच काळात सरकारने इतर विविध देशव्यापी सर्वेक्षणे केलीत. ज्यात वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२ व २०२२-२०२३ साठी वार्षिक श्रमशक्ती सर्वेक्षण, २०२२-२०२३चे घरगुती वापर सर्वेक्षण, २०२१-२०२२ व २०२२-२०२३साठी असंघटित व्यवसायाचे सर्वेक्षण, २०२०च्या नागरी नोंदणी प्रणाली अंतर्गत जन्म आणि मृत्यूच्या नोंदणीचे वार्षिक सर्वेक्षण, २०१९-२०२०चे आरोग्य सर्वेक्षण, २०२०-२०२१चे राज्यांची शाश्वत विकास ध्येयासंबंधी कामगिरीचे सर्वेक्षण व भारतीय कृषी अनुसंधान परिषदद्वारे 'शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट करणे-राज्यवार संश्लेषण' सर्वेक्षण-२०२२ समाविष्ट आहेत. जनगणनेची आवश्यकता लोकसंख्या जनगणना स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर मानवी संसाधनांची स्थिती, लोकसंख्याशास्त्र, संस्कृती आणि आर्थिक संरचना यावर मूलभूत माहिती प्रदान करते. ही सर्व माहिती राष्ट्राच्या भावी वाटचालीला दिशा देण्यासाठी आणि आकार देण्यासाठी महत्त्वाची आहे. सार्वत्रिकता आणि समकालीनता ही जनगणनेची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे भारताच्या आकारमानावर आधारित मोठ्या लोकसंख्येची मोजणी करणे हे अभूतपूर्व काम आहे. भारताची आगामी दशवार्षिक जनगणना ही मालिकेतील १६वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८वी जनगणना असेल. हे खरोखरच एक मोठे कार्य आहे ज्यासाठी देशभरातील अंदाजे १४५ कोटी (१.४५ अब्ज) लोकांची गणना करण्यासाठी अंदाजे तीस लाख प्रगणक आणि निरीक्षकांची आवश्यकता असेल. प्रगणक आणि निरीक्षक प्रामुख्याने स्थानिक शाळेतील शिक्षक, केंद्र आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश सरकारचे अधिकारी आणि स्थानिक संस्थांकडून घेतले जातात, जे जनगणनेच्या कामासाठी प्रत्येक घराला भेट देतील. महत्त्वपूर्ण भूमिका जनगणना हा श्रमशक्तीचा आकार आणि त्याची वैशिष्ट्ये तसेच शिक्षण आणि प्रशिक्षण, सध्याचे आणि अपेक्षित स्तर आणि आवश्यक राष्ट्रीय धोरणांशी संबंधित इतर पैलूंशी संबंधित माहितीचा मुख्य स्रोत मानला जातो. महिलांच्या सबलीकरणासाठी विविध धोरणात्मक कार्यक्रमांची रचना करण्यासाठी आणि त्यांची भूमिका सुधारण्यासाठी आणि श्रेणीसुधारित करण्यासाठी आवश्यक धोरणे ओळखण्यासाठी तसेच समाजातील त्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी महिलांची आकडेवारी गोळा करणे आवश्यक ठरते. ती माहिती जनगणनेने प्राप्त होते. त्याचबरोबर देशातील विशेष लोकसंख्येच्या गटांबद्दल जसे मुले, तरुण, वृद्ध, अपंग इत्यादी गटांबद्दलचे कार्यक्रम आणि धोरणे आखण्यात जनगणना महत्त्वाची भूमिका पार पाडते. जनगणना माहिती सार्वजनिक आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये संशोधन, गुंतवणूक आणि व्यावसायिक निर्णय सुलभ करण्यात मदत करते. देशाचे आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जनगणना वास्तविक व अलीकडील माहिती प्रदान करते. जनगणनेस विलंब तीन वर्षांपासून रखडलेल्या जनगणनेसाठी केंद्राने २०२१-२०२२ मधील अर्थसंकल्पात ३,७६८ कोटी रुपये ठेवले होते, पण आता २०२४-२०२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात फक्त १,३०९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मागील अर्थसंकल्पात (२०२३-२०२४) फक्त ५७८.२९ कोटी रुपयांची तरतूद केली होती. येथे नमूद करावेसे वाटते की २०११च्या जनगणनेसाठी अंदाजे २,२०० कोटी रुपये लागले होते. वर्ष २०१९ मध्ये जनगणनेसाठी मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या १२,७०० कोटी रुपयांच्या खर्चाच्या तुलनेत, या वर्षी अर्थसंकल्पात जनगणना आणि राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी तयारीसाठी केवळ १,३०९ कोटी रुपये एवढी माफक तरतूद केल्याने, या वर्षी देखील जनगणना होईल की नाही यावर काही अभ्यासकांनी शंका व्यक्त केली आहे.



काही अभ्यासकांच्या मते, हा विलंब धोरणात्मक असू शकतो. मानवी विकास आणि सुविधांपर्यंतच्या उपलब्धतेचे दावे जनगणनेच्या माहितीद्वारे खोटे ठरू शकतात किंवा सरकार इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) लोकसंख्येच्या आकाराची गणना करू इच्छित आहे किंवा ठराविक गटांच्या वाढीच्या प्रजनन दरांविषयीचे आकडे गैरसोयीचे ठरू शकतात इत्यादी चर्चा समाजमाध्यमात चर्चिली जात आहे. कारण सरकारने २०२१च्या जनगणनेला उशीर करण्याबाबत कोणतेही विश्वसनीय स्पष्टीकरण दिलेले नाही. जनगणना देशातील प्रत्येक व्यक्तीकडून माहिती गोळा करते. जनगणनेद्वारे संकलित केलेला डेटा प्रशासन, नियोजन आणि धोरण तयार करण्यासाठी तसेच सरकारद्वारे चालवल्या जाणार्या किंवा सादर केल्या जाणार्या विविध कार्यक्रमांचे व्यवस्थापन आणि मूल्यमापन करण्यासाठी अत्यावश्यक आहे. यामुळे देशाचे, भविष्यासाठीचे विकासात्मक सुसंगतता धोरण-निर्धारण आणि शास्त्रशुद्ध नियोजन आखण्यास व देशातील नैसर्गिक व मानवी संसाधनांचा इष्टतम वापर होण्यासाठी जनगणना होणे आवश्यक आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१,०८,५४,९७७ होती व आता वर्ष २०२४ मध्ये देशाची अंदाजे लोकसंख्या १४५,०९,३५,७९१ आहे. त्यामुळे २०११च्या जनगणनेच्या आधारे किंवा त्यावर आधारित अंदाजित आकडेवारीच्या आधारे देशाचे नियोजन करणे निश्चितच योग्य राहणार नाही. आज कळीचा मुद्दा असलेल्या आरक्षणाचीही आखणी करताना ही आकडेवारी महत्त्वाची ठरणार आहे. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असा महिला आरक्षण कायदा लागू होण्याआधी ही जनगणना होणे आवश्यक आहे. कारण, यावरूनच लोकसभा, विधानसभा मतदारसंघ फेररचना, आरक्षित मतदारसंघ हे सारे ठरणार आहे.

# वाहनचालकांना गुलाब देऊन सन्मान मद्यपान करून गाडी चालवु नका



नवी मुंबई / के. एच. हनवते :- अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल, शिव वाहतूक सेवा नवी मुंबई यांच्या सहाय्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी मा सौ हेमागिनी पाटील मॅडम, मा सुरेन्द्र निकम साहेब उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मा गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासन आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले मार्गदर्शक व्यसनमुक्ती जनजागृती यांच्या साहाय्याने वाहन चालक दिन पाम बीच सिग्नलला तसेच विभागात सर्व वाहन चालकांना गुलाबाचे फुल देऊन वाहन चालक दिनानिमित्त वाहन चालकांचा सन्मान यावेळी नेरूळ पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा श्री ब्रह्मानंद नाईकवाडी साहेब, मा श्रीकात धरणे साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुर्भे श्री कृष्णा धामापूरकर साहेब पोलीस निरीक्षक सीवूड वाहतूक विभाग, हनुमान गलांडे साहेब पोलीस उपनिरीक्षक वाहतूक विभाग, पवार साहेब पोलीस उपनिरीक्षक वाहतूक विभाग तुर्भे, विनय मोरे साहेब प्रवक रस्ता सुरक्षा महाराष्ट्र राज्य, सौ संगिताताई दिलीप आमले संचालिका अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल नवी मुंबई मोटर ट्रेनिंग स्कूल मालक संघटना सदस्य, श्री म्हात्रे श्री जगताप, सौ संगिता दाते, तसेच सर्वानी वाहतूक नियम पाळावे हेल्मेट, सिट बेल्ट वापर,सिग्नल,झेब्रा क्रॉसिंग, सर्व नियम पाळावे वाहतूक पोलीस स्थानिक पोलीस व सहकारी सदस्य उपस्थित होते नियम पाळणारे वाहन चालक यांच्या सन्मान करण्यात आला.

# 'या' लोकांनी चुकूनही करू नका वांग्याचे सेवन,आरोग्यावर होतील गंभीर परिणाम



प्रत्येक घरात पालेभाज्या, कडधान्य, इतर फळ भाज्यांपासून भाजी बनवली जाते. जेवणाच्या ताटात भाजी नसेल तर चपाती खाता येत नाही. त्यातील अनेकांच्या आवडीची भाजी म्हणजे वांग. वांग्याच्या भाजीपासून वांग्याची भाजी, भरीत, चटणी, वांग्याचे काप इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. वांग्याची चवीला चांगली लागते. पण आपल्यातील अनेकांना वांग्याची भाजी खायला आवडत नाही. वांग्याच्या भाजीचे नाव घेतल्यानंतर लोक नाक मुरडतात. कारण वांग्यामध्ये असलेल्या बिया काहींच्या आरोग्यसाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला कोणत्या लोकांनी आहारात वांग्याच्या भाजीचे सेवन करू नये, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. 'या' लोकांनी चुकूनही करू नका वांग्याच्या भाजीचे सेवन: शरीरात रक्ताची कमतरता: ज्या व्यक्तींच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे अशांनी आहारात वांग्याच्या भाजीचे सेवन करू नये. रक्ताची कमतरता असलेल्या लोकांनी वांग्याच्या भाजीचे सेवन केल्यास आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. वांग खाल्यामुळे शरीरात आणखीन रक्ताची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रक्ताची कमतरता असलेल्यांनी वांग खाणे टाळले पाहिजे. ऍलर्जी: वांगी खाल्यानंतर काहींच्या हातापायांमध्ये वात निर्माण होण्याची शक्यता असते. वाताचा त्रास होऊ लागल्यानंतर हात पाय दुखण्यास सुरुवात होते. तशीच हातापायांची बोट वाकडी होऊ लागतात. तसेच वांगी खाल्ल्यानंतर काहींच्या घश्यात खाज आणि सुज येणे येऊ पोटात दुखते. असा त्रास असलेल्या लोकांनी चुकूनही आहारात वांग्याचे सेवन करू नये.

किडनी स्टोन: किडनी स्टोनचा त्रास असलेल्या लोकांनी बिया असलेल्या पदार्थांचे सेवन करू नये. हे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकतात. किडनी स्टोन हा एक अनुवांशिक आजार असून किडनी स्टोन असलेल्या व्यक्तीच्या पोटात दुखते. त्यामुळे किडनी स्टोन असलेल्या लोकांनी आहारात वांगी आणि इतर बियायुक्त भाज्यांचे सेवन करू नये. शरीरावर गाठ असणे: शरीराच्या कोणत्याही भागावर गाठ असलेल्या लोकांनी आहारात वांग्याचे सेवन करू नये. वांग्यासह टोमॅटो, बटाटा, शिमला मिरची इत्यादी भाज्या खाणे टाळले पाहिजे. या भाज्या खाल्ल्यामुळे त्रास आणखीन वाढू शकतो.

# सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा कुरकुरीत कॉर्न डोसा, वाचा सोपी रेसिपी





सकाळी झोपेतून उठल्यानंतर फ्रेश होऊन नाश्ता करणे आवश्यक आहे. पण काही कामाच्या धावपळीमध्ये नाश्ताच करत नाही. असे केल्यामुळे आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर कितीही काम असेल तरी सुद्धा नाश्ता करावा. नाश्ता केल्यामुळे पोटही भरलेले राहते आणि आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. सकाळी उठल्यानंतर पचनास हलका आणि पोट भरेल असा नाश्ता करावा. अनेक घरांमध्ये नाश्त्यासाठी पोहे, उपमा, शिरा, इडली, डोसा इत्यादी पदार्थ बनवले जातात. पण तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन खाण्याची इच्छा होते. अशावेळी नेमकं काय बनवावं हा प्रश्न सर्वच महिलांना पडतो. अशावेळी तुम्ही नाश्त्यामध्ये कॉर्न डोसा बनवू शकता. मक्याचे दाणे आरोग्यासाठी पौष्टीक असतात.चला तर जाणून घेऊया कॉर्न डोसा बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: मक्याचे दाणे रवा हिरवी मिरची आलं पाणी कॉर्न फ्लेक्स चिली फ्लेक्स ओरेगॅनो मीठ कोथिंबीर तेल कृती: कॉर्न डोसा बनवण्यासाठी सर्वप्रथम एका वाटीमध्ये रवा, मक्याचे दाणे, हिरव्या मिरचीचे बारीक तुकडे आणि पाणी टाकून मिक्स करून घ्या.

त्यानंतर त्यात कॉर्न फॉअल, चिली फेल्क्स, ओरेगॅनो, मीठ, कोथिंबीर टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा. डोश्याच्या मिश्रणात जास्त पाणी टाकू नये. अन्यथा डोश्याची चव बिघडू शकते. डोसा बनवण्यासाठी पॅन गरम करायला ठेवा. त्यानंतर त्यावर थोडेसे तेल टाकून गरम झाल्यानंतर त्यावर डोसाचे मिश्रण टाकून पसरवून घ्या.

दोन्ही बाजूने डोसा व्यवस्थित भाजल्यानंतर तयार आहे कॉर्न डोसा.

# ऑफिसमधील टॉक्सिक वातावरणाशी दोन हात करण्यासाठी 'या' टिप्स फॉलो करा



दोन दिवसांपूर्वी पुण्यातील एका मोठ्या कंपनीमध्ये सीए पदावर कार्यरत असणाऱ्या तरुणीने जीवन संपवले. तिच्या मृत्यूमुळे सगळीकडे एकच खळब उडाली. ती मूळची केरळ राज्यातील असून कामानिमित्त पुण्यात राहत होती.मृत्यू झालेल्या मुलीच्या आईने कंपनीतील टॉक्सिक वातावरणामुळे माझ्या मुलीचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले. मागील अनेक दिवसांपासून मुंबई, पुण्यासह आयटी कंपीनीमध्ये चालू असलेल्या टॉक्सिक वातावरणाचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर दिसून येत आहे. दिवसभराच्या २४ तासांमध्ये ज्या ठिकाणी कामानिमित्त आपण आठ ते दहा तास असतो, तिथे जर चांगले वातावरण नसेल तर मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर त्याचे नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता असते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे केरळच्या तरुणीचा मृत्यू.

आयटी क्षेत्रात चालू असलेल्या प्रदूषित वातावरणामुळे अनेकांच्या मानसिक आरोग्यावर त्याचे परिणाम दिसून आले आहेत. स्पर्धेच्या युगात स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहे. त्यात प्रत्येक व्यक्तीला यश मिळेलच असे नाही. प्रत्येक व्यक्ती स्वतः च्या यशासाठी खूप धडपड करत असते. पण चुकीच्या पद्धतीने मिळाले यश फार काळ टिकत नाही. त्यामुळे ऑफिसमधील टॉक्सिक वातावरणात टिकून राहण्यासाठी आज आम्ही तुम्हाला काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. या टिप्स फॉलो केल्यामुळे तुमच्या मनात नकारात्मक विचार येणार नाहीत. ऑफिसमधील टॉक्सिक वातावरणात टिकून राहण्यासाठी या टिप्स: नियमित व्यायाम करणे: स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी मोठी धडपड केली जाते. कामानिमित्त अनेकदा ऑफिसमध्ये ८ तासांपेक्षा जास्त वेळा थांबून राहावे लागते. दिवसभर सतत काम करत राहिल्यामुळे शरीरातील ऊर्जा कमी होऊन जाते. त्यामुळे शरीरात ऊर्जा दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी सकाळी उठल्यावर व्यायाम करणे आवश्यक आहे. व्यायाम केल्यामुळे शरीराला आणि मनाला खूप फायदे होतात. मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. तसेच मन शांत राहते. पौष्टिक आहार: चुकीच्या जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर दिसू लागल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक गंभीर समस्या उद्भवू लागतात. तसेच ऑफिसमध्ये अधिक वेळ राहिल्यामुळे जेवायला किंवा नाश्ता करण्यासाठी वेळ भेटत नाही. पण कामातून थोडासा वेळ काढून स्वतःसाठी देणे आवश्यक आहे. तसेच आहारात पौष्टीक पदार्थांचे सेवन करणे गरजेचे आहे. निरोगी जीवनशैली ठेवण्यासाठी आहारात फळे, ज्युस, कडधान्य इत्यादी पौष्टिक पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. आठ तासांची झोप: शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आठ तास झोप घेणे गरजेचे आहे. आठ तासांपेक्षा कमी झोपल्यामुळे जीवनशैलीमध्ये बिघाड होतो. सतत काम करून थकलेल्या शरीराला विश्रांती देणे गरजेचे आहे. इतर वेळी पूर्ण झोप घेण्यास शक्य नसेल तर सुटीच्या दिवशी आठ तास झोप घेतली पाहिजे. आवड आणि छंद जोपासणे: ऑफिसामधील कामातून वेळ काढून स्वतःच्या कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे. यामुळे मन आनंदी राहते. तसेच कामातून वेळ महिन्यातून एकदा किंवा दोनदा बाहेर फिरायला जावे. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यामुळे मानसिक तणाव कमी होतो. तुमच्या आवडीनिवडी छंद जोपासून तुम्ही मनाला फ्रेश करू शकता.

## मसालेदार आणि चटपटीत पदार्थ खाण्याची इच्छा झाली आहे! मग बनवून पहा मसाला कॉर्न

सुट्टीच्या दिवशी घरी असल्यानंतर किंवा इतर वेळी काहींना काही चटपटीत आणि मसालेदार पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी दोनच पर्याय असतात. त्यातील एक म्हणजे विकत काहींना काही आणून खाणे किंवा घरी बनवणे. पण अनेकजण विकतचे पदार्थ खाण्यास जास्त प्राधान्य देतात. सतत बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाल्ल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे विकत मिळणारे पदार्थ खाण्यापेक्षा घरी बनवलेले पौष्टिक पदार्थ खाण्यास प्राधान्य द्यावे. ज्यामुळे आरोग्याला सुद्धा फायदे होतील. आज आम्ही तुम्हाला संध्याकाळी तिखट किंवा चटपटीत पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यानंतर कोणता पदार्थ बनवावा, याबद्दल सांगणार आहोत. चटपटीत किंवा मसालेदार पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यास तुम्ही मसाला कॉर्न बनवून शकता. हा पदार्थ कमीत कमी वेळात तयार होतो. चला तर जाणून घेऊया मसाला कॉर्न बनवण्याची सोपी रेसिपी.साहित्य: मक्याचे कणीस लसूण पेस्ट धणे पावडर तूप लिंबाचा रस काश्मिरी लाल मिरची पावड मीठ कॉर्नफ्लोअर चाट मसाला हिरवी मिरची कृती: मसाला कॉर्न बनवण्यासाठी सर्वप्रथम मका स्वच्छ करून धुवून घ्या. त्यानंतर मक्याचे तीन समान तुकडे करून घ्या. त्यानंतर मक्याची कणस शिजण्यासाठी स्टीमरमध्ये ठेवा. १५ मिनिटांनी गॅस बंद करून मके थंड होण्यासाठी ठेवा. वाटीमध्ये २ चमचे आले-लसूण पेस्ट, २ चमचे लिंबाचा रस, १ चमचे काश्मिरी लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करून घ्या. तयार केलेला मसाला मक्याच्या कणीसाना व्यवस्थित चोळून घ्या. पॅनमध्ये तेल गरम करण्यासाठी ठेवा. तेल गरम झाल्यानंतर तूप टाकून त्यात मसाला लावलेले मके टाकून भाजून घ्या. मके भाजून झाल्यानंतर त्यात चाट मसाला आणि तूप टाकून पुन्हा एकदा व्यवथित मिक्स करून घ्या. सगळ्यात शेवटी मसाला कॉर्न सर्व्ह करताना वरून कोथिंबीर आणि लिंबाचा रस टाकून सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेलं मसाला कॉर्न.

# सिस्टेमा.बायोने सुरू केला इंडिया डेअरी बायोगॅस कार्यक्रमाचा दुसरा टप्पा

## बायोगास प्लांट्स शेतकऱ्यांना परवडण्याजोग्या किमतीत उपलब्ध



लातूर - सिस्टेमा.बायो ही आधुनिक नाविन्यपूर्ण बायोगॅस तंत्रज्ञानासाठी ओळखली जाते आणि हा जागतिक स्तरावरील सामाजिक उद्योग आहे. या कंपनीने आपल्या इंडिया डेअरी बायोगॅस कार्बन प्रोग्रामच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली आहे. या टप्प्यांतर्गत महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान या राज्यांमध्ये ५०,००० हून अधिक बायोगॅस प्लांट्स स्थापित करण्यात येतील, ज्यामुळे छोट्या दुग्धोउत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन किमतीवर ५० ते ७० टक्क्यांपर्यंतची सूट मिळत पर्यावरणपूरक ऊर्जा उपलब्ध होईल. हे बायोगॅस प्लांट्स प्रतिदिन ३ ते ५ तास स्वयंपाकासाठी गॅस देतील, रासायनिक खतांचा वापर ७० ते ८० टक्क्यांनी कमी करतील आणि घरामध्ये कोणतेही वायू प्रदूषण न करता शुद्ध शेतीची खात्री देतील. बायोगॅस प्लांट्स १० वर्षांच्या वॉरंटीसह देखील येतात, ज्यामुळे शेतकऱ्यांना दीर्घकाळापर्यंत फायद्यांची खात्री मिळते. या उपक्रमाला अधिक पाठिंबा देण्यासाठी सिस्टेमा.बायो दुग्धशाळा सहकारी संस्था आणि ग्रामीण संस्थांसोबत सहयोगाने प्रचार मोहिमा राबवेल, ज्याचा प्रत्यक्ष छोट्या दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल. हा उपक्रम म्हणजे भारतभरातील छोट्या दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोत अधिक कार्यक्षमतेने उपलब्ध करून देण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. डेअरी बायोगॅस कार्बन प्रोग्रामचा पहिला टप्पा खूप यशस्वी ठरला, ज्यामधून प्रेरणा घेत हा दुसरा टप्पा राबवला जात आहे. पहिल्या टप्प्यात लक्ष्य राज्यांमध्ये ५०,००० आधुनिक बायोगॅस प्लांट्स स्थापित करण्यात आले. त्यामुळे वार्षिक ३४०,००० टन कार्बन उत्सर्जन कमी झाले आहे. सध्या स्वयंपाकासाठी तसेच ऊर्जेच्या गरजांसाठी जीवाश्म इंधनांवर व एलपीजीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्यामध्ये कस्टमाइझ करण्याजोगे बायोगॅस प्लांट्सचा पुरवठा करण्यात येईल. प्रतिदिन २ ते ३० घनमीटर निर्मिती करण्याची क्षमता असलेले हे बायोगॅस प्लांट्स शेतकऱ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन तयार केले जात आहेत. हे प्लांट्स पर्यावरणपूरक ऊर्जा तर देतीलच, शिवाय आर्थिक भार कमी करतील आणि कार्बन उत्सर्जनात कपातीचे उद्दिष्ट गाठण्यातही योगदान देतील. ह्लभारतात सात कोटींहून (७० दशलक्ष) अधिक शेतकरी आहेत आणि त्यातील दोन-तृतीयांश स्वयंपाकासाठी अद्याप जळाऊ लाकडांवर अवलंबून आहेत. तसेच शेतीच्या उपकरणांना पुरेसा वीजपुरवठा मिळत नाही आहे, असे सिस्टेमा.बायोचे इंडिया कंट्री डायरेक्टर श्री. पीयूष सोहनी म्हणाले. आधुनिक बायोगॅस तंत्रज्ञान या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात स्वावलंबी करू शकते, त्यांचे जीवाश्म इंधने व रासायनिक खतांवरील अवलंबन कमी करू शकते आणि कार्बन उत्सर्जनही मोठ्या प्रमाणात कमी करू शकते. आम्ही आमच्या इंडिया डेअरी बायोगॅस प्रोग्रामच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव घडवून आणण्याप्रती कटिबद्ध आहोत आणि पुढील एक वर्षात ५०,००० हून अधिक बायोगॅस प्लांट्स उभारण्याचे उद्दिष्ट आमच्यापुढे आहे. सिस्टेमा.बायोच्या डेअरी बायोगॅस कार्बन प्रोग्रामच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांची नोंदणी गोल्ड स्टॅण्डर्ड इम्पॅक्ट रजिस्ट्रीमध्ये करण्यात आली आहे आणि या टप्प्यांमध्ये कार्बनविषयक दहा महत्त्वाच्या तत्त्वांचे काटेकोर पालन केले जात आहे. ज्यामुळे प्लांट्समध्ये निर्माण झालेले कार्बन क्रेडिट्स अस्सल व उच्च दर्जाची असण्याची खात्री मिळते. शेतांवर उभारण्यात आलेल्या प्रत्येक बायोगॅस प्लांट्सवर बारकाईने देखरेख ठेवली जात आहे. कार्बन उत्सर्जन अचूकपणे कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना सर्वसमावेशक प्रशिक्षण व सेवा पुरवल्या जात आहेत. शेतकऱ्यांकडून गोळा केलेली माहिती गोल्ड स्टॅण्डर्डकडे पाठवली जाते, त्यानंतर थर्ड पार्टी व्हेरिफिकेशन एजन्सी शेताला भेट देते आणि शेतकऱ्यांसोबत चर्चा करून प्लांट्समध्ये निर्माण झालेली कार्बन क्रेडिट्स अस्सल आहेत याची खात्री देते. सिस्टेमा.बायोचे आधुनिक बायोगॅस प्लांट्स यूव्ही-प्रतिरोधक व अज्वलनशील पडद्यांचे (मेम्ब्रेन) एलएलडीपीई (लीनियर लो-डेन्सिटी पोलीथायलीन) वापरून तयार केले जातात. त्यामुळे उच्च दर्जाच्या टिकाऊपणाची खात्री मिळण्यासोबत प्लांट्स २० वर्षांहून अधिक काळापर्यंत कार्यरत राहतात. प्रत्येक बायोगॅस प्लांट शेतकऱ्याच्या गरजांनुसार उभारला जातो, प्रशिक्षणादरम्यान विशिष्ट फीडिंग रेशो स्पष्ट करून सांगितले जातात. हे बायोगॅस प्लांट्स स्थापित करण्यास सोपे आहेत. त्यासाठी पाया किंवा विस्तृत बांधकामाची गरज नाही. त्यामुळे ते आव्हानात्मक किंवा पोहोचण्यास कठीण अशा भूप्रदेशांसाठी अनुकूल आहेत. शिवाय, सिस्टेमा.बायो प्रकल्पाच्या कस्टमायझेशनपासून, उत्पादनापर्यंत आणि क्षमताबांधणीपासून स्थापनेपर्यंत सर्व सेवा पुरवते. तसेच २४/७ विक्री-पश्चात्त ग्राहकसेवाही पुरवते. अधिक पुढे जात इंडिया डेअरी बायोगॅस कार्बन प्रोग्राम वार्षिक ३,००,००० ते ५,००,०० टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन कमी करण्याची अपेक्षा आहे.

# डॉ. प्रशांत मुगळे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

लातूर / प्रतिनिधी :- लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात कार्यरत असलेले उपमुख्याध्यापक डॉक्टर प्रशांत मुगळे यांना नुकताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्यावतीने कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले, पंढरपूर देवस्थानाचे कार्यकारी अध्यक्ष हा ब प गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते अखिल भारतीय पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अशोक जी वानखेडे व राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे, जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते यांचे उपस्थितीत दयानंद सभागृहामध्ये प्रशांत मुगळे यांना हा पुरस्कार दिला गेला. प्रशांत मुगळे हे महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम मंडळ नववी दहावी इंग्रजी चे सदस्य असून त्यांनी दहावी बोर्डाचं मुख्य नियमक म्हणून व प्रश्नपत्रिका सेटर म्हणूनही काम पाहिले आहे, गत पंचवीस वर्षापासून महाराष्ट्रातील इंग्रजी अध्यापकांना इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण ते महाराष्ट्र स्तरावरील तज्ञ मार्गदर्शक म्हणून देत आहेत. आतापर्यंत सहा इंग्रजी आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये त्यांनी भारताचे व महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून त्या ठिकाणी सादरीकरणही केले आहे यामध्ये दोन आंतरराष्ट्रीय परिषदांमधील त्यांच्या सादरीकरणाला उत्कृष्ट सादरीकरणाचा बहुमान ही मिळालेला आहे डॉक्टर प्रशांत मुगळे यांची पाच पुस्तके प्रकाशित असून त्यांनी





लिहिलेल्या दहा लेख आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये घेतली गेलेली आहेत. श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात अध्यापनाचे काम करत असताना ते विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून तो ओळखले जातातच यासोबतच दहावीचा त्यांचा निकाल गेले वीस वर्षे अत्यंत उत्कृष्ट लागलेला आहे एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून प्रशांत मुगळे यांची ओळख परिसरात आहे, त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष माननीय लक्ष्मी रमणजी लाहोटी संस्था अध्यक्ष माननीय शैलेश जी लाहोटी संस्था सचिव माननीय चंद्रशेखरजी बाजपाई माननीय संस्था सदस्य नावांदर र्जी सुहास शेट्टीजी भराडीयाजीमा .राजस्थान शालेय समितीचे अध्यक्ष माननीय लक्ष्मीकांत जी करवा मुख्याध्यापक व सर्व स्तरातून प्रशांत मुगळे यांचे अभिनंदन होत आहे.

# लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कडून भाजपचे अनिल बोंडे व शिवसेनेचे

## आमदार संजय गायकवाड यांचा निषेध.




लातूर / प्रतिनिधी :- अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते मा.खा.राहुलजी गांधी यांच्या विरोधात संतापजनक विधान करणारे भाजपा चे अनिल बोंडे आणि शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कडून आज दि.१९ सप्टेंबर गुरुवार रोजी लातूर शहरातील संविधान चौक या ठिकाणी आंदोलन करीत निषेध व्यक्त करण्यात आला . यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव,गोरोबा लोखंडे,कैलास कांबळे,ड. बाबासाहेब गायकवाड,सचिन बंडापल्ले,दगडूअप्पा मिटकरी,प्रवीण सूर्यवंशी,इम्रान सय्यद,ड. देविदास बोरुळे पाटील,प्रा. प्रवीण कांबळे,आसिफ बागवान, जालिंदर बर्डे,दत्ताभाऊ सोमवंशी,आयुब मणियार, बाळासाहेब देशमुख,धोंडीराम यादव, नागसेन कामेगांवकर,प्रा.सुधीर आणवले,प्रा.संजय ओहळ,राम स्वामी,तबरेज तांबोळी,विकास वाघमारे,हमीद बागवान,ड.विजय गायकवाड,ड.शरद देशमुख, डॉ.बालाजी साळुंके,अक्षय मुरुळे,शेख कलीम, सुलेखाताई कारेपूरकर,आकाश भगत,भालचंद्र सोनकांबळे,राजेश गुंठे,विजय टाकेकर,कुणाल वागज, अराफत पटेल,राहुल डूमणे,काशिनाथ वाघमारे,मंगेश वैरागे,किरण बनसोडे,अभिषेक पतंगे,अमोल गायकवाड,राजू गवळी,रोहित दयाळ, भाऊसाहेब भडीकर,संजय सुरवसे,करीम तांबोळी,पिराजी साठे, सिराज शेख,फारूक शेख,पवनकुमार गायकवाड, एजाज शेख,आसिफ मणियार,बबलू कुरेशी,ऋषिकेश देशमुख,नितीन कांबळे,पवन बनसोडे,इब्राहिम शेख, सोमनाथ तोटाळे यांच्यासह लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, सदस्य आदी मान्यवर उपस्तिथ होते.

# दीक्षाभूमी दक्षता समिती आपल्या मिशनमध्ये यशस्वी झाली

नागपुर /प्रतिनिधी :- २५ जुलैला नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरण चे आयुक्त संजय मीना यांना दीक्षाभूमी दक्षता समितीच्या शिष्टमंडळाने एक निवेदन देऊन चेतावणी दिलेली होती. दीक्षाभूमी चे मैदान जैसे थे करून द्यावा लागेल. यावर आयुक्त संजय मीना यांनी शब्द दिला होता २० सप्टेंबर पूर्वी दीक्षाभूमी च्या मैदानावरील खड्डे बुजविण्यात येतील. २० सप्टेंबरला २ दिवस शिल्लक असतानी पुन्हा आज दीक्षाभूमी दक्षता समितीच्या अध्यक्ष मायाताई उके यांच्या नेतृत्वात एका शिष्टमंडळाने आज आयुक्त संजय मीना यांची भेट घेतली. चर्चेत अनेक विषयावर चर्चा झाल्या,त्यावर आयुक्त संजय मीना यांनी पुन्हा तेच सांगितले की दोन दिवसांमध्ये दीक्षाभूमी चे सर्व खड्डे बुजविण्यात येतील.त्यावर शिष्टमंडळाने संजय मीना यांना पाच दिवसाची पुन्हा मुदत दिली व सांगितले २५ सप्टेंबर पर्यंत मैदानां वरील सगळे खड्डे बुजवून मैदान सुशोभित व्हायला पाहिजे. अन्यथा २६ सप्टेंबर पासून तीव्र आंदोलन करण्यात येईल. त्यानंतर दीक्षाभूमी दक्षता समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दीक्षाभूमी मैदानाचे निरीक्षण केले. निरीक्षण केल्यानंतर दीक्षाभूमी दक्षता समितीच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केला. दीक्षाभूमी मैदाना वरील खड्डे बुजवण्याचे काम ९० टक्के झालेला आहे, फक्त पाऊस आला तर बौद्ध अनुयायाची गैरसोय होऊ शकते. पाऊस नाही आला तर धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडेल अशी अपेक्षा दीक्षाभूमी दक्षता समितीने व्यक्त केली आहे. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष मायाताई उके यांच्यासोबत समितीचे सल्लागार व उपाध्यक्ष किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब,सचिव पौर्णिमा ताई शेंडे, कोषाध्यक्ष सुनीताताई रंगारी,सदस्या मध्ये रूकमाताई नानवटकर शोभाताई अंबादे, प्रतिभाताई नागदेवे, रंजनाताई गणवीर,उषाताई उपरे, अशा असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दीक्षाभूमी दक्षता समितीने आतापर्यंत जो काही पत्रव्यवहार केला आहे त्या पत्र व्यवहारामुळे आंदोलनामुळे व मायाताई उके यांच्या कुशल नेतृत्वामुळे आंबेडकरी समाज यशस्वी झाला आहे. काल आम्ही नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरण नागपूरचे आयुक्त संजय मीना, स्मारक समितीचे अध्यक्ष भंते सुरई ससाई, नागपूरचे जिल्हाधिकारी, यांना निवेदन देऊन २५ तारखेपर्यंत ५ दिवसाची अधिकची वेळ दिली होती. २५ तारखेपर्यंत संपूर्ण दीक्षाभूमी मैदानाचे खड्डे बुजवून मैदान स्वच्छ करण्याचे निर्देश दिले होते. २५ तारखेपर्यंत संपूर्ण मैदान व्यवस्थित न झाल्यास २६ तारखेला तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. हे बघा काल २ तासा मधली कारवाई! बौद्ध उपासक/ उपासिका व आंबेडकरी जनतेच्या समोर आहे. स्मारक समितीचे अध्यक्ष भंतेजी, समाज कल्याणचे उपायुक्त, सामाजिक न्याय विभागाचे सचिव, व नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरण नागपूरचे आयुक्त यांनी संयुक्त दीक्षाभूमी परिसराच्या दौरा केला. व दीक्षाभूमी दक्षता समितीने जे निर्देश दिले त्यावरच त्यांनी कारवाई केली. खरोखरच दीक्षाभूमी दक्षता समितीच्या अध्यक्षा मायाताई उके यांच्या कुशल नेतृत्वाचा हा परिणाम आहे.





पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक भाऊ वानखेडे यांचा सत्कार जिल्हा सचिव अशोक हनवते यांनी केला

# स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी चापोलीकर बसले उपोषणाला.

## उपविभागीय अधिकाऱ्याच्या आश्वासननंतर उपोषण मागे.

चाकूर/ प्रतिनिधी :- चापोली ( ता.चाकूर ) येथील सार्वजनिक स्मशानभूमीला रस्ता नसल्यामुळे अंत्यविधीच्या वेळेस ग्रामस्थांना मोठा त्रास होत असल्याने हा रस्ता करावा यासाठी वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाकडुन दखल जात नव्हती त्यामुळे सोमवारपासून (ता. १६) ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणाला सुरवात केली होती.त्यामुळे १७ सप्टेंबर रोजी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील व शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांनी मध्यस्थी करून प्रशासासणाला उपोषणाची दखल घेण्यास भाग पाडले व प्रशासनाने लेखी पत्र देऊन उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसिलदार नरसिंग जाधव यांच्या हस्ते उपोषण कर्ते यांना नारळ पाणी देऊन उपोषण स्थगित केले.

चापोली गावातील सार्वजनिक स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता नाही, पावसाळ्यात अंत्यविधीला जाता येत नाही. सततच्या या त्रासामुळे ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. येथील रस्त्याचे काम करावे,



स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे, त्यामुळे परिसरात स्वच्छता करावी, सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या मागणीचे निवेदन अनेक वर्षापासून ग्रामस्थ तहसीलदार, गटविकास अधिकारी, सरपंच डॉ भालचंद्र चाटे यांच्याकडे देत आहेत परंतु दखल घेतली गेली नसल्याने चापोली येथील सुरेश शेवाळे,निलेश मद्रेवार ,गणेश तेलंगे, नवनाथ गोरगीळे, मनोज शिंदे, रमेश कांबळे,भाऊसाहेब हुलगुंडे,बाळू भोसले, राजु गुडपले, बालाजी शेवाळे, धनंजय शिंदे, लक्ष्मण पल्लेवाड, राजू काचे, तुळशीराम काचे, नारायण काचे, सुधाकर जगदाळे , निळू जगदाळे ,मधुकर जगदाळे, रमाकांत जगदाळे, बळी जगदाळे, बालाजी गुंजाळे, विनायक हुलगुंडे, बाबाराव जाधव, नरसिंग शेवाळे, तुकाराम गायकवाड, सोपान पवार, आकाश पवार आदि ग्रामस्थ उपोषणास बसले होते.माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील व शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांनी मध्यस्थी केली. उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना दूरध्वनी वरून संपर्क सधून उपोषणकरत्याशी संवाद घडवून आणला. १० दिवसात रस्ता मोकळा करून देण्याच्या अटीवर उपोषण मागे घेण्याचा निर्णय उपोषणकर्त्यानी घेतला.यावेळी उपोषणस्थळी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसिलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे यांच्यासह आदी नागरीक उपस्थित होते.

# महिला मेळाव्यांना महिलांचा मोठा प्रतिसाद श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला संवाद काँग्रेस पक्षाचा हात आम आदमी के साथ

पुन्हा एकदा संधी द्या, विश्वासाने विकास करुन घ्या रीड लातूरच्या संस्थापिका सौ.दीपशिखा धिरज देशमुख महिलांशी संवाद साधताना म्हणाल्या, आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत प्रामाणिकपणे मतदारसंघाचा विकास केला.मतदारसंघातील मतदारांनी पुन्हा एकदा आमदार धिरज देशमुख यांना संधी देऊन विश्वासाने विकास कामे करुन घ्यावीत, असे आवाहन केले.



लातूर / प्रतिनिधी :- देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यापासून देशाला महासत्ता बनविण्यापर्यंतचा सर्वांगिण विकास काँग्रेस पक्षानेच केलेला आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काँग्रेस पक्षाने धोरणं आखून त्याची यशस्वी अंमलबजावणी केली. तोच धागा पकडून विकासरत्न विलासराव देशमुख यांनी महाराष्ट्राचा विकास केला. त्यांच्या विचारावर पाऊल टाकत माजी मंत्री आमदार अमित देशमुख व आमदार धिरज देशमुख काँग्रेस पक्षाचा हात आम आममी के साथ, या उक्तीप्रमाणे सर्वसामान्यांच्या विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणात राबवित आहेत. त्यामुळे येत्या काळातही तमाम मतदारांनी पुन्हा काँग्रेस पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. रेणापूर तालूक्यातील इंदरठाणा, दर्जीबोरगाव, गव्हाण येथे दि. १९ सप्टेंबर रोजी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांशी संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धीरज देशमुख, डॉ. सारीका देशमुख, सुनिता अरळीकर, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेरमण सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हाईस ॲड. प्रमोद जाधव, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेरमण अनंतराव देशमुख, रेणापूर महिला काँग्रेस अध्यक्षा पुजाताई इगे, रेणापूर महिला कॉग्रेस शहर अध्यक्षा निर्मलाताई गायकवाड यांच्यासह आदी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, येत्या दोन महिन्यात विधानसभेची निवडणूक लागणार आहे. निवडणुकीची रणधुमाळी सुरु होणार आहे.या रणधुमाळीत भाजपाची मंडळी पुन्हा आपल्यासमोर येऊन दिशाभुल करणारी आश्वासने देतील, खोट्या जाहिरातींचे अमिष दाखवतील तेव्हा मतदारांनी त्यांच्या खोट्या प्रचाराला बळी न पडता ते नेहमी आपल्या सुख-दु:खात सोबत असतात असे लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांना पुन्हा आशिर्वाद द्यावा.विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आमदार धिरज देशमुख व त्यांचे सर्व सहकारी लातूर ग्रामीण मतदारसंघाच्या विकासासाठी कायम तत्पर आहेत.आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षात मतदारसंघाचा केलेला विकास आपल्या समोर आहे. दृश्यस्वरुपात विकासाची कामे आपल्याला पाहता येतील. शिवाय मांजरा परिवारातील साखर कारखाने आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकजयांमध्ये आर्थिक क्रांती घडविली आहे. त्यामुळे विकासाच्या गप्पा मारणाजयांना अजिबात थारा न देता आमदार धिरज देशमुख यांना आशिर्वाद द्यावा. याप्रसंगी महिला बचत गट मेळावा सभेसाठी उपस्थित असलेल्या महिला दैवशाला जोगदंड, फरजाना सय्यद, सरस्वती पवार, सरिता पवार, अनिता पवार, दिपाली माने, मंगलबाई घोडके, सारिकाबाई घोडके, मैणाबाई घोडके, शालूबाई क्षीसागर, मेराजबी सय्यद, कुशिर्वता रणदिवे, प्रतिक्षा माने, अश्वीनी पवार, किमाइण इंगोले, सावित्री पवार, रेखा पवार, प्रियंका पवार, चंद्रकला पवार यासह आदी महिलांची उपस्थित होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE